दि.२७.०३.२०२४

प्रति,
प्राचार्य,
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
(स्वायत्त)

विषय - संगीत अभ्यास मंडळ बैठकीचा अहवाल ...

महोदय,

संगीत अभ्यास मंडळाची बैठक शनिवार दि.०९ मार्च २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. संगीत विभागात घेण्यात आली. बैठकीस अभ्यास मंडळाचे चेअरमन प्रा. हरिसर्वोत्तम जोशी, सदस्य प्रा. शशिकांत देशमुख, प्रा. वैभव माने, डॉ. पल्लवी पाटील यांची उपस्थिती होती. तसेच डॉ. संदीप जगदाळे, प्रा.रवींद्र क्षीरसागर यांची Zoom Aap द्वारेऑनलाईन उपस्थिती होती.

१) **बैठकीतील विषय**– मागील बैठकीचा वृत्तांत सादर करणे

- **चर्चा-** अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. हरिसर्वोत्तम जोशी यांनी मागील अभ्यासमंडळ बैठकीचे वृत्तांत वाचन केले व त्या वर उपस्थित सर्व सदस्यांनी चर्चा केली.
- **ठराव-** सर्व अभ्यास मंडळातील सदस्यांनी एकत्रितपणे मागील वृत्तांताला मान्यता दिली.

२) **बैठकीतील विषय**– NEP -2020 नुसार अभ्यासक्रमाबद्दल चर्चा करणे

- **चर्चा-** मा. सर्व सदस्यांनी – NEP -2020 अभ्यासक्रमावर सविस्तर चर्चा केली. त्यांनी पदवी प्रथम GE / OE या विषयावर सकारात्मक चर्चा करत त्यामध्ये येणा-या विविध घटकांवर आपले मत व्यक्त केले.
- **ठराव-** चर्चेअंती सर्व मा. सदस्यांनी GE / OE या नवीन अभ्यासक्रमास मान्यता दिली.

३) **बैठकीतील विषय**– NEP -2020 नुसार पदवी द्वितीय वर्षासाठी GE / OE चा अभ्यासक्रम तयार करून मान्यता घेणे.

- **चर्चा-** मा. सर्व सदस्यांनी – NEP -2020 नुसार पदवी द्वितीय वर्षाच्या GE / OE अभ्यासक्रमासंदर्भात चर्चा केली. यामध्ये अभ्यासक्रमाचे शीर्षक, अभ्यासक्रम, उद्दीष्टे, परिणाम इ. विषयांवर चर्चा झाली.
- **ठराव-** उपस्थित सर्व मा.सदस्यांनी एकत्रित चर्चा करून पदवी द्वितीय वर्षाच्या GE / OE या नवीन अभ्यासक्रमास मान्यता दिली.

**४) बैठकीतील विषय**– फिडबॅक फॉर्मद्वारे संकलित केलेल्या अभ्यासक्रमावरील अभिप्रायावर चर्चा करणे.

- **चर्चा-** मा. सर्व सदस्यांनी फिडबॅक फॉर्म मध्ये केलेल्या सर्व घटकांचा अभ्यास करून त्यावर सकारात्मक चर्चा करून अभ्यासक्रमामध्ये काहीसा बदल करण्याचे ठरवले.
- **ठराव-** मा. सर्व सदस्यांच्या परवानगीने फिडबॅक फॉर्म मध्ये आलेल्या अभिप्रायाचा विचार करून अभ्यासक्रमात पदवी प्रथम मधील अभ्यासक्रमात बदल करण्यात आला.

**५) आयत्या वेळेचे विषय** – बी.ए. तृतीय वर्षातील अभ्यासक्रमासंदर्भात चर्चा करणे.

- **चर्चा-** मा. सर्व सदस्यांनी बी.ए. तृतीय वर्षातील अभ्यासक्रमावर चर्चा करत असताना प्रात्याक्षिक व लेखी या अभ्यासक्रमावर मा. सदस्यांनी आपले मत व्यक्त केले. त्यामध्ये येणा-या राग,ताल, धमार, तसेच इतर घटकांवर चर्चा केली .
- **ठराव-** मा. सर्व सदस्यांच्या परवानगीने बी.ए. तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रम उत्कृष्ठ दर्जाच्या असून तो अभ्यासक्रम जशाच तसा ठेवावा असे सुचित केले.

आपला विश्वासू ,

**प्रा. हरिसर्वोत्तम जोशी**
**संगीत विभागप्रमुख**
**राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर (स्वायत्त)**